G.K. GOKHALE COLLEGE KOP.

शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत.

एक दिवसीय कार्यशाळा

## "संत साहित्याचे मराठी साहित्यातील योगदान"

## कार्यक्रमाची रुपरेषा

गुरुवार, दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१९ — वेळ सकाळी ९०.०० ते दुपारी ०४.००

**नांव नोंदणी व चहापान :-** सकाळी ९०.०० ते १०.०० वा.

**उदघाटन समारंभ :-** सकाळी १०.०० ते १०.३० वा.

**सत्र प्रथम :-** सकाळी १०.३० ते दुपारी ११.३०

**विषय -**

व्याख्याते - मा.प्रा. डॉ. गोपाळ गावडे,
महावीर महाविद्यालय,
कोल्हापूर.

**सत्र व्दितीय :-** दुपारी ११.४५ ते १२.४५

**विषय -**

मा.प्रा.डॉ.गोमटेश पाटील,
महावीर महाविद्यालय,
कोल्हापूर.

**भोजन :-** दुपारी ०१.०० ते ०१.३०

**सत्र तृतीय :-** दुपारी ०१.३० ते ०२.३०

**विषय -**

मा.प्रा.डॉ.विश्वास पाटील,
राधानगरी महाविद्यालय राधानगरी,

**समारोप समारंभ आणि प्रमाणपत्र वाटप :-** दुपारी ०३.०० ते ०३.३०

शिक्षण प्रसारक मंडळाचे
गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, अग्रणी महाविद्यालय योजना पुरस्कृत,
श्री शाहाजी छत्रपती प्रमुख अग्रणी महाविद्यालय अंतर्गत,
"एक दिवसीय कार्यशाळा"

" संत साहित्याचे मराठी साहित्यातील योगदान "
दि. ७ फेब्रुवारी २०१९

- अहवाल -

दि. ०७ फेब्रुवारी २०१९ रोजी सकाळी ठिक ९.४५ वाजता मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. बी. गडकरी, कौन्सील मेंबर डॉ. पी. के. पाटील प्रा. डॉ. गोपाळ गावडे, प्रा. डॉ. गोमटेश पाटील, प्रा. डॉ. विश्वास पाटील हे उपस्थित होते.

विभागप्रमुख प्रा. आर. एच. पाटील यांनी उद्घाटन सत्राचे स्वागत आणि प्रास्ताविक केले. प्रास्ताविकात त्यांनी महाविद्यालयाच्या उज्वल परंपरेचा आढावा घेतला. मराठी साहित्यात संत साहित्याचे योगदान किती आणि कसे महत्त्वाचे आहे हे सांगत असतानाच विद्यार्थ्यांनी या साहित्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे हे विशद केले.

या कार्यशाळेमध्ये, उद्घाटन सत्रामध्ये शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ व गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर यांच्यात 'सामंजस्य करार' संपन्न झाला. या प्रसंगी मराठी शिक्षक संघाच्या वतीने डॉ. गोपाळ गावडे उपस्थित होते. त्यांनी या प्रसंगी मराठी भाषेसाठी अशा प्रकारच्या सामंजस्य कराराची किती आवश्यकता आहे, महाविद्यालयीन स्तरावर मराठी भाषेच्या अभ्यासकांसाठी तो किती उपयुक्त आहे हे पटवून दिले.
या नंतर प्राचार्य एम. बी. गडकरी सरांनी अध्यक्षीय भाषणामध्ये

मराठी भाषेची महती आणि संतसाहित्याची उपयुक्तता विशद केली.

पहिल्या सत्राचे तज्ञ निबंधवाचक डॉ. गोपाळ गावडे यांनी अनेक छोटी छोटी गोष्टीरूप उदाहरणे देत मराठी साहित्यात संत साहित्याचे असणारे स्थान स्पष्ट केले. पहिल्या सत्राचे अध्यक्ष प्रा. आर. एम. बिसुरे यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

दुसऱ्या सत्रामध्ये प्रा. डॉ. गोमटेश पाटील यांनी मराठीतील संत त्यांचे साहित्य, विविध संप्रदाय त्यांनी केलेली वाङ्मयीन कामगिरी या विषयीचे मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष प्रा. डॉ. सी. पी. कुरणे यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

भोजनावकाशानंतर तिसऱ्या सत्राला सुरूवात झाली या सत्रामध्ये प्रा. डॉ. विश्वास पाटील यांनी संतांनी आपले साहित्य निर्माण करताना किती वाङ्मयीन प्रवाह नव्याने जन्माला घातले, आधुनिक साहित्याची बीजे कशा पध्दतीने संत साहित्यात सापडतात यावर प्रकाश टाकला. स्त्री संतांनी केलेल्या वाङ्मयीन आविष्कारावर मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष प्रा. डॉ. पी. के. पाटील यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.

या नंतर समारोपाच्या सत्रामध्ये मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. एस. आर. गडदे यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. के. पवार यांनी केले.

या कार्यक्रमासाठी शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी मा. प्रा. जयकुमार देसाई, तसेच पेट्रन कौन्सिल मेंबर मा. दौलत देसाई तसेच प्रशासन अधिकारी प्रा. डॉ. मंजिरी देसाई-मोरे यांनी शुभेच्छा दिल्या. समारोप कार्यक्रमास सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होता.

धन्यवाद.